# गॉडफ्रे फिलिप्स इंडिया लिमिटेड

सीआयएन : L16004MH1936PLC008587
नोंद. कार्यालय : 'मॅक्रोपोलो बिल्डिंग', तळमजला,
काळा चौकी पोस्ट ऑफिसशेजारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, लालबाग,
मुंबई-४०००३३. दूरध्वनी : ०२२-६१९५ २३००/फॅक्स : ०२२-६१९५ २३१९
कॉर्पो. कार्यालय : ४९, कम्युनिटी सेंटर, फ्रेंड्स कॉलनी, नवी दिल्ली-११००२५
दूरध्वनी : ०११-२६८३२१५५, २६८४०१४८
ईमेल : isc-gpi@modi.com/ वेबसाईट : www.godfreyphillips.com

## सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, गॉडफ्रे फिलिप्स इंडिया लिमिटेडच्या सभासदांची ७९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ("एजीएम") सोमवार दि. २६ सप्टेंबर २०१६ रोजी दु. ३.०० वाजता वाय. बी. चव्हाण सभागृह, जनरल जगन्नाथ भोसले मार्ग, (सचिवालय जिमखान्यालगत) मुंबई ४०००२१ येथे होणार असून एजीएम आयोजनाच्या सूचनेत दिलेल्याप्रमाणे सभेत कामकाज होईल.

एजीएम आयोजनाची सूचना, वार्षिक अहवाल, प्रॉक्सी फॉर्म आणि उपस्थितीविषयक चिठ्ठी (स्लिप) कंपनीच्या नोंदणी पुस्तकात तसेच भाग हस्तांतरण एजंट/डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स सह नोंदवलेल्या सभासदांच्या ई-मेल पत्त्यांवर इलेक्ट्रॉनिक स्वरुपात पाठवण्यात आले आहेत. मात्र ज्या सभासदांनी कागदोपत्री अर्थात हार्ड कॉपीसाठी विनंती केली त्यांना हार्ड कॉपी देण्यात येईल. अन्य सर्व सभासदांना वैध संमत माध्यमाव्दारे भौतिक प्रती पाठवण्यात आल्या आहेत. सभासदांना ही कागदपत्रे ई-मेलव्दारा तसेच अन्य संमत माध्यमाव्दारे पाठवण्याचे काम शुक्रवार, २ सप्टेंबर २०१६ रोजी पूर्ण झाले आहे.

सभासदांनी कृपया नोंद घ्यावी की वार्षिक अहवाल, एजीएमची सूचना ज्यामध्ये ई-मतदान प्रक्रियेचे समग्र वर्णन व प्रक्रिया, प्रॉक्सी अर्ज तसेच उपस्थितीसाठी चिठ्ठी कंपनीच्या **www.godfreyphillips.com** वर उपलब्ध आहेत आणि कंपनीच्या नोंदणीकृत तसेच कॉर्पोरेट कार्यालयातूनही ही कागदपत्रे घेता येतील.

एजीएम सूचनेत संदर्भित केलेली कागदपत्रे कंपनीच्या सभासदांना पाहणी/ निरीक्षणासाठी कंपनीच्या नोंद्णीकृत तसेच कॉर्पोरेट कार्यालयात, एजीएमच्या तारखेपर्यंत सर्व कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत उपलब्ध राहतील.

कंपनीज (व्यवस्थापन आणि प्रशासन) सुधारणा नियम, २०१५ सह कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १०८ च्या तरतुदींच्या अनुपालनाने आणि सेबी (एओडीआर) नियमन, २०१५ च्या नियम ४४ नुसार कंपनीला आपल्या सभासदांना इलेक्ट्रॉनिक पध्दतीने त्यांचा मतदानाचा अधिकार बजावण्याची सुविधा पुरवण्यास आनंद वाटतो आहे. नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) व्दारा पुरवण्यात येणाऱ्या दुरस्थ ई-मतदान पध्दतीने कामकाज करता येणार आहे. दूरस्थ ई-मतदान कालावधी **शुक्रवार २३ सप्टेंबर २०१६** रोजी **स.** ९.०० वाजता सुरु होईल आणि **रविवार दि. २५ सप्टेंबर २०१६** रोजी **सायं.** ५.०० वाजता समाप्त होईल. त्यानंतर दूरस्थ ई-मतदान यंत्रणा निकामी करण्यात येईल.

दि. १९ सप्टेंबर २०१६ या निर्धारीत अर्थात कट-ऑफ तारखेला असलेल्या कंपनीच्या भरणा केलेल्या समभाग भांडवलाच्या प्रमाणात असलेल्या सभासदांच्या भागांनुसार त्यांना मतदानाचे हक्क मिळतील. सदर कट-ऑफ तारखेला भौतिक वा डीमटेरियलाईज्ड स्वरुपात भागधारण असलेल्या सभासदांना दूरस्थ ई-मतदानाची वा एजीएमच्या ठिकाणी मतदानाची सुविधा घेता येईल. एजीएमची सूचना पाठवून झाल्यानंतर एखाद्या व्यक्तीने भाग घेतले असतील आणि कट ऑफ तारखेला म्हणजेच १९ सप्टेंबर २०१६ रोजी ते भागधारक बनले असतील तर अशा व्यक्तीला, **evoting@nsdl.co.in** येथे विनंती पाठवल्यावरून लॉगईन आयडी व पासवर्ड घेता येईल.

एजीएमच्या ठिकाणी, मतपत्रिकेव्दारा मतदान करण्याची सुविधा उपलब्ध राहील आणि "कट ऑफ" तारखेला अर्थात १९ सप्टेंबर २०१६ रोजी जे सभासद असतील आणि ज्यांनी दूरस्थ ई-मतदानाव्दारे मतदानाचा हक्क बजावला नसेल अशांनाच ,एजीएमच्या ठिकाणी मतपत्रिकेव्दारा मतदानाचा आपला हक्क बजावता येईल. एजीएमपूर्वी ज्या सभासदांनी इलेक्ट्रॉनिक पध्दतीने आपला मतदानाचा हक्क बजावलेला असेल अशांना एजीएमला उपस्थित राहता येईल. मात्र त्यांना पुन्हा मतदानाचा हक्क बजावता येणार नाही.

ई-मतदान प्रक्रिया विषद असलेली एजीएमची सूचना कंपनीच्या **www.godfreyphillips.com** वेबसाईटवर आणि एनएसडीएलच्या **https://www.evoting.nsdl.com** वेबसाईटवर उपलब्ध आहे.

कोणतीही चौकशी वा स्पष्टिकरण लागल्यास सभासदांनी वारंवार विचारण्यात येणारे प्रश्न (एफएक्यूज) आणि ई-मतदान यूजर मॅन्युअल पहावे जे **https://www.evoting.nsdl.com** च्या डाऊनलोड्स विभागात आहे अथवा एनएसडीएलसह टोल फ्री क्र. : १८००-२२२-९९० वर संपर्क करावा अथवा श्री. संतनू मुखोपाध्याय, सहाय्यक उपाध्यक्ष, लिंक ईनटाईम इंडिया प्रा. लि. यांच्याशी सी-१३ पन्नालाल सिल्क मिल्स कंपाऊंड, एलबीएस रोड, भांडुप पश्चिम, मुंबई-४०००७८ येथे संपर्क करावा किंवा त्यांच्या दूरध्वनी क्र. ०२२-२५९४६९७० वर अथवा त्यांच्या ई-मेल आयडी **santanu.mukhopadhyay@linkintime.co.in** येथे संपर्क करावा.

कंपनीज (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियमन, २०१४ च्या नियम १० सह कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ९ अन्वये आणि सेबी (एलओडीआर) नियमन, २०१५ च्या नियम ४२ नुसार पुढे अशी सूचना देण्यात येत आहे की, एजीएमच्या उद्देशाने आणि ३१ मार्च १०१६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी जाहीर झाल्यास, लाभांश प्राप्तीसाठी योग्य सभासदांच्या नावांच्या निश्चितीसाठी, कंपनीची सभासद नोंदणी आणि भाग हस्तांतरण पुस्तिका मंगळवार, २० सप्टेंबर २०१६ पासून सोमवार, दि. २६ सप्टेंबर २०१६ पर्यंत (दोन्ही दिवस धरून ) बंद ठेवण्यात येतील.

**गॉडफ्रे फिलिप्स इंडिया लिमिटेड** करिता
स्वाक्षरी/-
संजय गुप्ता
कंपनी सचिव

दिनांक : ३ सप्टेंबर २०१६
(एम. नं. ७५४५)